<u>प्रेसनोट</u>

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २८.०४.२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लचलुचपत प्रतीबंधक विभाग, अमरावती घटक, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १. श्री.शामकुमार पाडुंरंग इझाटे, वय ४२ वर्षे, पद – कॅम्पुटर ऑपरेटर कंत्राटी, मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चौक अमरावती रा.श्री खत्री याचे घरी किरायाने, स्ववलंबी नगर, कठोरा रोड अमरावती मुळ पत्ता :– वॉर्ड क्र ०१, मु.पो.फुबगाव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती<br>२. श्री बाळासाहेब डिगांबर खंडारे वय ४८वर्षे व्यवसाय :– नोकरी उपकार्यकारी अभियंता, मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चौक अमरावती, रा. टेलीकॉम कॉलनी, सुनंदा खरड याचे घराजवळ, नवाथे अमरावती वर्ग-2 |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २४/०४/२०२६ चे १९/०८ ते १९/२४ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | १५,०००/–रुपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १५,०००/–रुपये |
| ६ | घटनास्थळ | मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चौक अमरावती या कार्यालयाचे गेट जवळ |

**थोडक्यात हकिकत** :– यातील तक्रारदार यांनी दिनांक २८/०४/२०२६ रोजी तक्रार दिली की,तक्रारदर यांनी त्यानी दि.१६/०३/२०२६ रोजी मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चौक अमरावती या कार्यालयात त्याच्या भारत ग्रिन एनर्जी नावाने सोलर रुफ टॉप विक्रेता/पुरवठादार च्या नोदणि करीता अर्ज केला होता. तसेच त्या नोदणि बाबत त्यांनी त्याचे कर्मचारी मार्फत कामाचा पाठपुरावा सुध्दा केला होता. परंतु त्यांचे काम होत नव्हते करीता ते दि.२७/०४/२०२६ रोजी मा.अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल ओ अँण्ड एम सर्कल, गर्ल्स हायस्कुल चौक अमरावती या कार्यालयात जाउन आरोपी क्र ०१ यांना भेटले असता आरोपी क्र ०१ यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुमचे काम करुन देतो त्या करीता तुम्हाला मला २०,०००/– रुपये दयावे लागतील परंतु तक्रारदर याची लाच देण्याची इच्छा नसल्याकारणाने त्यांनी त्याबाबत ला.प्र.वि.अमरावती येथे तक्रार दिली

सदरच्या तक्रारीवरुन दोन शासकीय पंचासमक्ष दि.२८/०४/२०२६ रोजी नमुद इतर लोकसेवक आरोपी यांची पडताळणी केली असता आरोपी क्रमांक ०१ यानी तक्रारदार यांना तडजोडी अंती १५,००० /– रुपये लाचेची मागणी केली तसेच आरोपी लोकसेवक कक्र ०२ यांनी त्यांनी प्रोत्सहण दिले आणि लाच मागणीस होकार दिला तसेच आरोपी क्र ०१ यांनी लाचेची मगणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवली. वरुन सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम स्विकारतांना आरोपी क्रमाक ०१ यांना रंगे हात पकडण्यात आले सदर कारवाईत दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द पो.स्टे.गाडगेनगर अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र, श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, यांचे मार्गदर्शनाखाली पो.उपअधि श्री मंगेश मोहोड. पोनि.चित्रा मेसरे, पो.अंमलदार राजेश मेटकर, शैलेश कडु,वैभव जायले, उपेंद्र थोरात चालक श्री कुटुकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, मो.न. ९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर– १०६४.

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते

(मंगेश मोहोड)
पोलीस उपअधिक्षक,
ला.प्र.वि.अमरावती